महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
ग्राहक तक्रार निवारण मंच
कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

MAHADISCOM

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. ५८/२०१७-१८/ 77 दिनांक: ०५.०४.२०१८

**आदेश**

**आदेश केस क्र. ५८/२०१७-२०१८(दि.०५.०४.२०१८)**

| | | |
|---|---|---|
| श्री सुरज अशोक निकम<br>मे. साई ॲग्रो. इंडस्ट्रीजमु.पो. वांगी<br>ता. कडेगांव जि. सांगली | : | **तक्रार अर्जदार (ग्राहक** |
| **विरुध्द** | | |
| १) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, सांगली | | |
| २) कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, विटा | | **विरुध्द पक्षकार** |
| ३) उपकार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>उपविभाग कडेगांव | | |

**कोरमः-** १.श्री ए.व्ही. देशपांडे, अध्यक्ष
२.श्री. पी. व्ही. खपली, सदस्य सचिव,
३. श्री. पी. एस. पुजारी, ग्राहक सदस्य,

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदींनुसार

**न्यायनिर्णय**

मी ए.व्ही. देशपांडे अध्यक्ष, ग्राहक तक्रार.निवारण मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

१) प्रस्तुत प्रकरण तक्रारदारानी , अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, मंडल कार्यालय, सांगली त्यांच्या दिनांक ३०.१२.२०१७ निकालाने व्यथित होऊन दाखल केलेले आहे.

थोडक्यात हकीकत अशी की, तक्रारदाराने नविन औद्योगिक वीज जोडणीसाठी अर्ज देऊन कोटेशनचे पैसे दिनांक ०६.०२.२०१५ रोजी भरलेले असून देखील आजतागायत त्यास वीज जोडणी मिळालेली नाही. म्हणून त्याने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष मंडल कार्यालय, सांगली यांचेकडे 'क्ष' फॅार्म मध्ये तक्रार दाखल केली. सदर प्रकरणी कक्षा समोर दिनांक ०४.१२.२०१७ रोजी सुनावणी होऊन कक्षाने दिनांक ३०.१२.२०१७ रोजी आदेश पारीत करुन उपकार्यकारी अभियंता कडेगांव उपविभाग यांचे पत्र क्र. ३०८९ दिनांक ३०.०१.२०१७ च्या अहवालानुसार औद्योगिक वीज कनेक्शनकरिता (नवीन) तयार केलेल्या जेष्ठता यादीमध्ये तक्रारदाराचा क्रमांक २असा असून सदरचे नवीन वीज कनेक्शन देण्यासाठी योजना व निधी उपलब्ध झालेवर जेष्ठता यादीनुसार तक्रारदारास नवीन कनेक्शन देण्यात येईल. असा आदेश पारीत केला. सदर निकालाने समाधान न झाल्याने तक्रारदाराने प्रस्तुतची तक्रार या मंचाकडे दाखल करुन त्यास नवीन वीज जोडणी सत्वर देण्याच्या व नियमानुसार नुकसान भरपाई देण्याचा आदेश पारीत करावा अशी मागणी केलेली आहे.

**<u>वि.प. यांची भुमिका.</u>**

वि.प. नी प्रस्तुत प्रकरणाची नोटीस मिळाल्यानंतर या प्रकरणी हजर होऊन आपले लेखी म्हणणे या मंचासमोर हजर केले. त्यांच्या कथनानुसार तक्रारदाराचे नावे मौजे वांगी ता. कडेगांव जि. सांगली येथे पत्र क्र.EE/VT/T/REC-PIE/६४११/०९/२०१४-१५ या नुसार नवीन औद्योगिक वीज कनेक्शन मंजूर झालेले असून त्याकरिता तक्रारदाराने दिनांक ०६.०२.२०१५ रोजी कोटेशनचे पैसे देखील भरलेले आहेत. सदर जोडणी करीता ०.७८ कि.मी. ची उच्च दाब वीज वाहिनी ६३ के.व्ही.ए. चा रोहित्र व ०.०६ कि.मी. अंतराची लघुदाब वीज वाहिनी उभारणे आवश्यक आहे. तथापी सदर काम पूर्ण करुन नवीन जोडणी करणेकरीता सध्या कोणतीही योजना व निधी उपलब्ध नसल्याने सदरची जोडणी प्रलंबित आहे. माहिती तंत्रज्ञान विभाग सांगली यांचेकडून प्राप्त झालेल्या औद्योगिक जेष्ठता यादीनुसार तक्रारदाराचा अ.क्र.२ असल्याने कंपनीच्या नियमानुसार व ज्येष्ठता यादीनुसार आवश्यक काम करुन सदर जोडणी देण्यात येईल. तसेच उ.का.अ / ता / कडेगांव / २१४९ १०.०७.२०१७ चे पत्रानुसार तक्रारदारास सदरचे काम Non DDF या योजने अंतर्गत करणेकरिता सुचीत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणाची सुनावणी आज रोजी म्हणजे दिनांक ०५.०४.२०१८ रोजी घेण्यात आली असता तक्रारदार ग्राहक आपले प्रतिनिधी यांचे सोबत तर विद्युत वितरण कंपनीतर्फे उपकार्यकारी अभियंता उपविभाग कडेगांव श्री मुलाणी हजर होते, त्यांचे युक्तीवाद ऐकून घेण्यात आले. उपलब्ध कागदपत्रे वाचण्यात आली.

या मंचाच्या निर्णयासाठी खालील मुद्दे उपस्थित होतात.

मुद्दा क्र.१ :- तक्रारदार यांना त्यांच्या मागणीनुसार नविन औद्योगिक वीज जोडणी निश्चित कालावधीत देण्याचा आदेश व नुकसान भरपाई देणे योग्य होईल काय?

उत्तरः- होय

मुदा क्र.२:- अंतिम आदेश

उत्तरः- खालील प्रमाणे

## कारणमिमांसा

मुद्दा क्र.१ व २ प्रस्तुत प्रकरणात सर्वच तथ्य (Facts) उभयपक्षी मान्य आहेत. सदरच्या बाबी आम्ही वर विस्तृतपणे नमुद केलेल्या आहेत. विस्तारभयापोटी त्यांचा पुनरुच्चार आम्ही टाळलेला आहे. तक्रारदाराने नविन औद्योगिक वीज जोडणीकरिता दिनांक ३१.१२.२०१४ रोजी अर्ज दाखल केलेला असून तो मंजूर होऊन त्यास कोटेशन देण्यात आलेलेअसून त्या कोटेशन प्रमाणे दिनांक ०६.०२.२०१५ रोजी तक्रारदाराने एकूण रक्कम रु. ३२,१५०/- भरलेले आहेत. ही बाब वि.प.ने मान्य केली आहे. तक्रारदारास रु. ३२,१५०/- चे देण्यात आलेले कोटेशन व सदर रक्कम वि.प.कडे भरलेली पावती त्यांच्या प्रती तक्रारदाराने या कामी हजर केलेल्या आहेत.त्यानंतर देखील आजतागायत तक्रारदाराला नविन औद्योगिक वीज जोडणी (L.T.Ind) देण्यात आलेली नाही. ही वस्तुस्थिती वि.वि.कं.ने मान्य केलेली आहे. सदरची जोडणी देणे कामी ०.७८ कि.मी. ची उच्च दाब वीज वाहिनी , ६३ के.व्ही.ए. चे रोहित्र व ०.०६ कि.मी. ची लघुदाब वीज वाहिनी उभारणे आवश्यक असल्याचे वि.वि.कं.चे म्हणणे आहे. त्याबाबत तक्रारदाराचा कोणताही आक्षेप नाही. तथापी सदरची कामे पूर्ण करुन नवीन जोडणी करण्याकरिता कोणतीही योजना किंवा निधी उपलब्ध नसल्याचे सदरची जोडणी प्रलंबित आहे. तसेच नविन लघुदाब औद्योगिक वि.जोडणी देण्याकरिता तयार करण्यात आलेल्या प्रतिक्षायादीत तक्रारदाराचा अनु.क्र.२ असून कंपनीच्या नियमाप्रमाणे व सदर यादीप्रमाणे नविन जोडणी देण्यात येईल असे वि.वितरण कंपनीचे म्हणणे आहे. सदरचे म्हणणे ग्राहक तक्रार निवारण कक्षाने जसेच्या तसे मान्य करुन वर नमूद केलेला ओदश पारीत केलेला आहे. सदरचा आदेश योग्य नाही असे या मंचाचे मत आहे. त्याची कारणे पुढील प्रमाणे :-

कृती मानकानुसार लघुदाब औद्योगिक नविन वीज जोडणी करिता अर्ज दाखल झाल्या पासून ३ महिन्याचे कालावधीत नविन वीज जोडणी देणे हे वि.वि.कंपनीला बंधनकारक आहे. कृती मानके परिशिष्ट अ कलम ३ अनुसार वीज जोडणी मिळण्याकरिता परिपूर्ण अर्ज प्राप्त झाल्यापासून व आकारांचा भरणा केल्यानंतर ज्या ठिकाणी वितरण मेन्सचा विस्तार किंवा वाढ करणे आवश्यक असेल त्यावेळेस वीज पुरवठा कालावधी ३ महिने आहे असे नमूद आहे. आणि सदर कालावधीत वीज पुरवठा न झाल्यास विलंबाच्या प्रती आठवडयास किंवा त्यांच्या भागास रु. १००/- प्रती आठवडा अशी भरपाई देय आहे. कोणत्याही परिस्थितीत सदर कालावधीत किंवा देय असणारी भरपाईची रक्कम शिथील करण्याचे प्रावधान कृती मानकात नाहीत. त्यामुळे कृती मानकात नमूद केल्याप्रमाणे विहीत कालावधीत कामे पूर्ण करण्याचे बंधन विज वितरण कंपनीवर आहे. तशी पुर्तता न झाल्यास सदर परिशिष्टात रकाना ३ मध्ये नमुद केलेल्या नुकसान भरपाईची जबाबदारी विज वितरण कंपनीची आहे. तसेच कोणत्याही कारणास्तव सदरचे दायित्व वि.वि.कं.ला टाळता येणार नाही. ग्राहक तक्रार निवारण कक्षाने या बाबीचा विचार आपल्या आदेशात केला नाही. वि.वि.कंपनीच्या नियमानुसार व प्रतिक्षा यादीतील क्रमांकानुसार आवश्यक ते काम योजना व निधी उपलब्धतेनुसार वीज जोडण्यात येईल असे सुचित केलेले आहे. अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्षाचे काम सुचना देण्याचे नाही. त्या ग्राहकाचे तक्रारीचे निवारण कक्षाने केलेले नाही

5/12/20

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD., KOLHAPUR

महावितरण

केवळ वि.वि.कं. कडून आलेल्या पत्राचा उल्लेख करुन कंपनीच्या सुचनांचा पुर्नऊच्चार आपल्या आदेशात केलेला आहे व हे सर्वस्वी अयोग्य आहे. कक्षाने आपल्या आदेशात नमुद केलेले कंपनीचे नियम व जेष्ठता यादी यांच्या कुठलाही उल्लेख कृती मानकात या मंचास आढळून आलेला नाही. तक्रारदारास, विहित मुदतीत, त्यांचा नवीन वीज जोडणीचा अर्ज परीपूर्ण असताना व त्याने मागणी प्रमाणे रक्कमेचा भरणा केला असताना नवीन वीज जोडणी मिळण्याचा हक्क आहे व जर त्यास काहीही कारणांनी विलंब झाल्यास नुकसान भरपाई मिळण्याचा हक्क आहे व तो हक्क त्याला नाकारता येत नाही.

हे जरुर आहे की, तक्रारदाराने अंतर्गत तक्रार निवारण कक्षा समोर दिनांक ०२.११.२०१७ रोजी तर या मंचासमोर दिनांक १५.०१.२०१८ रोजी नवीन वीज जोडणीबाबत तक्रार दाखल केलेली आहे. ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल विनियम २००६ मधील अधिनियम ६.६ नुसार ज्या दिनांकास कारवाई करणेचे कारण घडले असेल हया दिनांकापासून दोन वर्षाच्या आत जर गा-हाणे दाखल केले नसेल तर मंच अशी तक्रार दाखल करुन घेणार नाही असे प्रावधान आहे. वरवर पहाता तक्रारदाराने दिनांक ०६.०२.२०१५ रोजी कोटेशनची रक्कम भरली असल्याने दिनांक ०६.०५.२०१५ पर्यन्त नवीन वीज जोडणी घेण्याचा हक्क होता व त्या तारखेनंतर विलंबाच्या प्रत्येक आठवडयाकरता रु.१००/- प्रमाणे नुकसान भरपाई मिळणेचा हक्क होता. याचा अर्थ या अर्जास किंवा अपिलास असलेले दाव्याचे कारण दिनांक ०६.०५.२०१५ रोजी घडले व त्यामुळे अधिनियम ६.६ अन्वये दिनांक ०६.०५.२०१७ रोजी किंवा त्यापूर्वी तक्रारदाराने तक्रार दाखल करणे आवश्यक होते व तसे न केल्याने सदरची तक्रार मुदत बाहय असल्याचे दिसते परंतु बारकाईने विचार करता ज्या अर्थी प्रत्येक आठवडयाच्या विलंबास नुकसान भरपाई मिळणेचा अधिकार ग्राहकाला आहे. त्या अर्थी अशी कारवाई करणेचे दाव्याचे कारण ग्राहकाचा विलंबाच्या प्रत्येक आठवडयास निर्माण होते. त्यामुळे असे दाव्याचे कारण हे Continuing cause of action असते तसेही पाहता आज रोजी तक्रारदाराने दाखल कलेल्या कागद पत्रावरुन असे दिसते की, दिनांक २९.०३.२०१७ पर्यन्त उभयपक्षकारात याबाबत पत्रव्यवहार चालू होता आणि दिनांक १०.०७.२०१७ च्या पत्राद्वारे तक्रारदारास हवे असल्यास सध्या स्व:खर्चातून म्हणजेच Non DDF योजनेतून आवश्यक असणारे काम करुन घ्यावे व तसे झाल्यास खर्चाची रक्कम वीज बिलातून परतावा मिळेल असे त्यास सुचीत करण्यात आले आहे. याचा अर्थ दिनांक १०.०७.२०१७ रोजी तक्रारदारास सामान्य प्रक्रीयेतून त्यांच्या मागणी प्रमाणे वीज जोडणी देण्यात येत नाही याची जाणीव अंतिमत: विज वितरण कंपनीने करुन दिलेली आहे. म्हणजे त्याही दिवशी तक्रारदारास तक्रार दाखल करण्यास आवश्यक अस णारे कारण निर्माण झाले व या तारखेपासून २ वर्षापर्यन्त अंतर्गत तक्रार निवारण कक्षामध्ये व या मंचासमोर तक्रारी दाखल केल्या आहेत व त्या मुदतीत आहेत.

सबब मुद्दा क्र.१ व२ चे वरील प्रमाणे होकारार्थी उत्तर देत आम्ही खालील आदेश पारीत करीत आहोत.

**<u>आदेश</u>**

१) प्रस्तुतची तक्रार मंजूर करण्यात येत आहे.
२) तक्रारदाराच्या दिनांक ०६.०२.२०१५ च्या अर्जानुसार त्यास मंजूर झालेली नवीनवीज जोडणी सर्व आवश्यक ती कामे पूर्ण करुन या आदेशाच्या तारखेपासून २ महिन्यांच्या आत देण्यात यावी.

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD. महावितरण

5/4/2018

३) तसेच या आदेशाच्या तारखेपासून २ महिन्याच्या आत, झालेल्या विलंबाकरिता रु. १५,२००/- इतकी नुकसान भरपाई द्यावी व आदेशाची पुर्तता झालेल्याचा अहवाल या मंचास द्यावा.

४) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

३) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| ( पी.एस. पुजारी) | (पी. व्ही. खपली) | (ए.व्ही. देशपांडे) |
| ग्राहक सदस्य | सदस्य सचिव | अध्यक्ष |

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD. KOLHAPUR ZONE
महावितरण